# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**(दुपार)**

**दिनांक ०५.०८.२०२६ बुधवार**

**नागपूर पोलीस आयुक्तालयातर्फे सर्वसामान्य जनतेस आवाहन : डायल ११२—एक कॉल अनेक सेवा तत्पर मदत**

नागपूर पोलीस आयुक्तालय अंतर्गत नागपूर पोलीस दल हे सर्वसामान्य जनतेच्या सेवेत २४ तास तत्पर असते. सर्वसामान्य जनतेस गुन्ह्यासंबंधाने अथवा कोणत्याही अडीअडचणीचे वेळीस पोलीसांची मदत मिळावी याकरीता शासनस्तर तसेच पोलीस खातेस्तरावरून पोलीस नियंत्रण कक्ष येथे मदतीकरीता डायल ११२ वर संपर्काची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. सर्वसामान्य जनतेस आवाहन करण्यात येते की, त्यांनी महिलासुरक्षा, घरगुती हिंसाचार, आगीच्या घटना, अपघात, गुन्ह्यांची/गुन्हेगारांची/अनैतिक कृत्य/असामाजिक कृत्य तसेच वैद्यकीय आणीबाणीबाबत माहिती देण्याकरीता/कळविण्याकरीता पोलीस नियंत्रण कक्ष येथे कार्यरत डायल ११२ वर संपर्क साधावा. कोणत्याही संकटसमयी आपणास डायल ११२ ची मदत २४ तास उपलब्ध असल्याने नागरीकांनी डायल ११२ चा उपयोग न संकोचता करावा. डायल ११२ वर कॉल करणारे कॉलर यांची माहिती गुप्त ठेवण्यात येते.

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची म.दा.का., जुगार व मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक ०४.०८.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. कायद्यान्वये ०२ केसेसमध्ये ०२ ईसमावर कारवाई करून एकुण ५,५००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जुगार कायदा अन्वये ०३ केसमध्ये १० इसमांवर कारवाई करुन ४,४४५/— रु. चा मुद्येमाल जप्त करण्यात आला आहे. वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली ३,३४३ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. २,०१,६००/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

दिनांक ०४.०८.२०२६ चे २३.०० वा. ते दिनांक ०५.०८.२०२६ चे ०५.०० वा. चे दरम्यान, केलेल्या रात्रगस्तीमध्ये कलम १३५ म.पो.का. कायद्यान्वये एकुण ०४ इसमांवर कारवाई करण्यात आलेली आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) गुन्हेशाखा अंमली पदार्थ विरोधी पथकाची कामगिरी :— गांजा बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक ०५.०८.२०२६ चे ००.२० वा. चे सुमारास, गुन्हेशाखा अंमली पदार्थ विरोधी पथकाचे अधिकारी व अंमलदार हे पोलीस ठाणे कोतवाली हद्यीत चितारओळी परिसरात पेट्रोलींग करीत असतांना, त्यांना नागोबा गल्ली नं. ०२ मध्ये पाढऱ्या रंगाची पिशवी हातात असलेला एक ईसम संशयीत हालचाल करतांना दिसून आला. त्याचे जवळ जात असता, तो पळून जाण्याचे तयारीत असतांना त्यास ताब्यात घेऊन त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्यांने त्यांचे नाव शेख जुबेर शेख आबिद वय २५ वर्ष रा. चितारओळी, नागोबा गल्ली नं. ०२, मंदीरसमोर, कोतवाली, नागपूर असे सांगितले. त्याचेजवळ अंमली पदार्थ असल्याचे दाट संशयावरून एनडीपीएस

कायद्यातील तरतुदींचे तंतोतंत पालन करुन, पंचासमक्ष त्याची व त्याचेजवळील पांढऱ्या पिशवीची झडती घेतली असता, त्याचे जवळील पिशवीमध्ये हिरव्या रंगाचा काळसर फुले–फळे असलेला व उग्रवासाचा ओलसर गांजा एकुण वजनी १ किलो १४५ ग्रॅम कि. २८,६२५/– रु. चा मिळुन आला. आरोपींचे ताब्यातुन गांजा व एक मोबाईल असा एकुण ४३,६२५/– रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपीची अधिक विचारपूस केली असता, आरोपीने नमुद गांजा त्याचे मोठे वडील पाहिजे आरोपी नामे इम्तीयाज जब्बार शेख वय अंदाजे ६० वर्षे रा. चितारओळी, नागोबा गल्ली नं. ०२, मंदीरसमोर, कोतवाली, नागपूर यांचा असून तो त्यांचेकडे गांजा विक्रीचे काम करीत असल्याचे सांगितले. आरोपी हा स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता गांजा विक्री करण्याकरीता बाळगतांना समक्ष मिळुन आला. आरोपींचे कृत्य हे कलम ८(क),२०(ब),(ii)(ब),२९ एन.डी.पी.एस.ॲक्ट नुसार होत असल्याने, आरोपींविरूध्द पोलीस ठाणे कोतवाली येथे गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. आरोपीस अटक करण्यात आली आहे. आरोपीस मुद्देमालासह कोतवाली पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पाहिजे आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी, सह. पोलीस आयुक्त, मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. भारत क्षीरसागर, पोहवा. पवन गजभिये, शैलेष दोबोले, अरविंद गेडेकर, रत्नाकर कोठे, पोअं. शेषराव रेवतकर, धनपत मंजरेटे, चापोहवा. नितीन साळुंके व मपोहवा. अनुप यादव यांनी केली.



**<u>३) एस्कॉर्ट पथकाची कामगीरी :– शस्त्र बाळगणाऱ्या आरोपींविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

मा. पोलीस आयुक्त यांचे विशेष एस्कॉर्ट पथकातील अधिकारी व अंमलदार हे दिनांक ०४.०८.२०२६ रोजी पोलीस ठाणे हिंगणा हद्दीत रात्रगस्त करीत असतांना हिंगणा आऊटर रिंग रोडवरील हॉटेल निर्मल ढाबाजवळ त्यांनी संशयावरून इर्टिका कार क्र. एमएच ४० डीई ७५१९ ला थांबवून वाहनाची झडती घेतली असता, वाहनात एक लोखंडी धारदार सुरा व लाकडी दांडा मिळून आला. लोखंडी सुऱ्याबाबत वाहन चालक नामे वृषल राजेंद्र कोराडे वय २० वर्षे रा. आमगाव देवरी, ता.  हिंगणा यास विचारपूस केली असता, त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली. नमुद ईसमाची वर्तणूक संशयास्पद दिसल्याने सदर ठिकाणी हिंगणा पोलीस ठाण्याचे रात्र अधिकारी यांना बोलावून त्यांचे ताब्यात आरोपी, त्याचे ताब्यातील वाहन व लोखंडी सुरा देण्यात आला. आरोपी हा कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकु बाळगतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे हिंगणा येथे आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का, सहकलम १३५,३७(१),३७(३) म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त यांचे मार्गदर्शनात सपोनि. भगवान कोळी, पोहवा. विजय गिरी, अरूण कांबे, पोअं. अर्शद शेख, आशिष गायधने, मनोज निमकर, दिनेश क्षिरसागर, चापोअं. प्रफुल धरमाडे यांनी केली.



**<u>४) सिताबर्डी पोलीसांची कामगीरी :— वाहन चोरीचा गुन्हा उघडकीस.</u>**

दिनांक ०२.०८.२०२६ चे २०.३० वा. ते दि. ०३.०८.२०२६ चे ००.३० वा. चे दरम्यान, फिर्यादी मोहम्मद अब्दुल आरीफ, वय ६७ वर्षे, रा. प्लॉट नं. १६, गोरेवाडा रिंग रोड अहवाग कॉलोनी, गिट्टीखदान नागपूर यांनी त्यांची हिरो स्प्लेंडर प्रो गाडी क्र. एम.एच. ३१ ई.एल.९४६० किंमती अंदाजे २०,०००/—रू. ची ही पोलीस ठाणे सिताबर्डी हद्दीत मोदी नं. ०१ येथे हेडाऊ बिल्डींगसमोर लॉक करून, पार्क करून मित्राला भेटायला गेले असता, कोणीतरी अज्ञात तीन चोरट्यांनी फिर्यादीची गाडी चोरून नेली अशा फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे सिताबर्डी येथे अज्ञात आरोपींविरूध्द कलम ३०३(२),३(५) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्हयाचे तपासात पोलीस ठाणे सिताबर्डी येथील तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक तपास करून, मिळालेल्या खात्रीशीर माहीती वरून तीन ईसमांना ताब्यात घेवून त्यांना नमुद गुन्ह्यासंबंधाने विचारपूस केली असता, त्यांनी नमुद गुन्हा संगनमताने केल्याची कबुली दिली. विचारपूस दरम्यान नमुद तीन ईसम विधीसंघर्षग्रस्त बालक असल्याचे दिसून आले. तीन विधीसंघर्षग्रस्त बालक यांचे ताब्यातुन नमुद गुन्ह्यातील चोरीस गेलेली स्प्लेंडर प्रो गाडी क्र. एम.एच. ३१ ई.एल.९४६० किंमती २०,०००/—रू. ची जप्त करण्यात आली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्रीमती अन्नपुर्णा सिंग, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. २), मा. श्री. सुधीरसिंग पवार, सहा. पोलीस आयुक्त (सिताबर्डी विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली वपोनि. सुहास राऊत, दुपोनि. मनिष कोल्हटकर, पोउपनि. श्याम वारंगे, पोअं. शत्रुघ्न मुंडे, नयनिष तलवारे यांनी केली.

**(गुन्हे)**

**<u>१) पोलीस ठाणे पाचपावली :— शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.</u>**

दिनांक ०४.०८.२०२६ चे २०.५० वा. चे सुमारास, पाचपावली पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, वैशाली नगर, शैतान चौक, पिवळ्या शाळेजवळ एक ईसम शस्त्र घेवून फिरत आहे. अशा सुचनेवरून तेथे गेले असता, मिळालेल्या वर्णनाचा इसम दिसून आला. त्यास ताब्यात घेवून पंचासमक्ष त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव शुभम प्रभाकर शंभरकर वय २८ वर्षे रा. वैशाली नगर, पिवळ्या शाळेमागे, दर्शन किराणाजवळ पाचपावली नागपूर असे सांगीतले. आरोपीचे अंगझडतीत त्याचे ताब्यातुन एक लोखंडी चाकु मिळून आल्याने, किंमती ३००/— रू. चा जप्त करण्यात आला.

आरोपी हा कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकु बाळगतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे पाचपावली येथे आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे शांतीनगर :– प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक ०४.०८.२०२६ चे १६.४५ वा. चे सुमारास, फिर्यादी यांची आत्या नामे शेवंतीबाई सहदेव गोन्नाडे वय ६० वर्षे रा. न्यु नागसेन नगर, प्लॉट नं. ४२२, पाण्याचे टाकीजवळ, कळमना, नागपूर ह्या पोलीस ठाणे शांतीनगर हद्दीत, कावरा पेठ, शितला माता मंदीरजवळील, सार्वजनिक रोडवरून रस्ता क्रॉस करीत असतांना, दुचाकी होंडा ड्रीम क्र. एम.एच. ४९ के. ०९३४ चा चालक याने त्याचे ताब्यातील दुचाकी वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन फिर्यादीचे आत्यास मागून धडक दिल्याने त्या खाली पडून त्यांचे हाताला व डोक्याला मार लागून गंभीर जखमी झाल्या. त्यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल येथे नेले असता डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषीत केले.

याप्रकरणी फिर्यादी श्याम छगनजी गोन्नाडे वय ३४ वर्षे रा. न्यु नागसेन नगर, प्लॉट नं. ४२२, पाण्याचे टाकीजवळ, कळमना, नागपूर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे शांतीनगर येथे वाहन चालकाविरूध्द कलम १०६(१),२८१ भा.न्या.सं., सहकलम १९४ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**पोलीस ठाणे इमामवाडा :–** दिनांक २२.०७.२०२६ चे १२.१५ वा. चे सुमारास, पोलीस ठाणे इमामवाडा हद्दीत, टि.बी वार्ड जवळ एक अनोळखी पुरूष वय अंदाजे ५० वर्षे वयाचे, अपघात अवस्थेत मिळुन आल्याने, त्यांना उपचाराकरीता मेडीकल हॉस्पीटल येथे वार्ड क्र. ०४ मध्ये दाखल केले होते. उपचारादरम्यान दिनांक ०४.०८.२०२६ चे १९.५० वा. डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषीत केले. मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही. मृतकास ओळखणाऱ्यांनी पोलीस ठाणे इमामवाडा येथे संपर्क साधावा.

याप्रकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरून पोलीस ठाणे इमामवाडा येथे पोउपनि. प्रविण लाखनकर यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**(मिसिंग)**

**पोलीस ठाणे पारडी :–** वंशिका रूपेश रोहणकर वय १६ वर्षे रा. प्लॉट नं. १४, १५ भवानी नगर रूक्मीणी शोरूमच्या बाजूला, पारडी, नागपूर ही दिनांक १९.०७.२०२६ चे ०९.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे पारडी हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेली. घरी परत आली नाही. तिचा शोध घेतला असता मिळून आली नाही. **वर्णन** रंग– सावळा, चेहरा–लांबट, बांधा– मध्यम, उंची– ५ फुट, केस– काळे लांब, डोळे–काळे, अंगात– निळ्या रंगाचा टॉप व निळी कार्गो पॅन्ट घातलेली आहे. भाषा– हिंदी/मराठी बोलते.



वंशिका

**स्वा/–**
**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**